**<u>नि.दि.दा.क्र. 68 / 2020</u>**

**<u>CNR-MHYA110021872020</u>**

## <u>नि. क्र. 22 खालील आदेश</u>

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादीने, सुभाष रामा गायकवाड यांना प्रतिवादी क्र. 6 म्हणुन दाव्यात पार्टी करण्याकरीता अथवा सदर दावा नॉन जॉइन्डर ऑफ नेसेसरी पार्टी या तत्वावर खारीज करण्यासाठी केलेला आहे.

2. प्रतिवादीचे असे कथन आहे की, वादीने प्रकरणामध्ये प्रतिवादी क्र. 1 ते 5 यांना पार्टी करुन दावा दाखल केला आहे. परंतु सदर दाव्यातील मालमत्ता आज रोजी सुभाष रामा गायकवाड यांच्या ताब्यात व उपभोगात आहे. सुभाष गायकवाड यांनी मालमत्ता घेण्यापुर्वी प्रतिवादी क्र. 01 ते 05 यांचा ताबा होता. त्यानंतर प्रतिवादी क्र. 01 ते 05 यांनी सदर वाद मालमत्ता सुभाष गायकवाड यांना नोटरी व्दारे विक्री केली. तेव्हापासुन सदर मालमत्तेवर सुभाष गायकवाड यांचा ताबा आहे. वाद जागा व वादीने खरेदी केलेली जागा हया वेगवेगळया आहेत. त्याने जागा खरेदी केल्यापासुन जागेचा ताबा घेतलेला नाही, त्यामुळे त्याची जागा कुठे आहे हे त्याला माहिती नाही, म्हणुन सुभाष गायकवाड यांनी खरेदी केलेली जागा म्हणजेच वाद जागा त्याचीच आहे असे गृहीत धरुन वादीने दावा दाखल केला आहे. वादीने न्यायालयाची दिशाभुल करुन खोटा व बनावट दावा दाखल करुन, मनाई हुकुम घेवुन वाद मालमत्तेचा ताबा घेण्याचा प्रयत्न करीत आहे. म्हणुन सुभाष गायकवाड यांना दाव्यात पार्टी करणे आवश्यक आहे. त्यामुळे सदर दाव्यात सुभाष गायकवाड यांना प्रतिवादी क्र. 6 म्हणुन पार्टी करण्याचा आदेश व्हावा अथवा सदर दावा नॉन जॉइन्डर ऑफ नेसेसेरी पार्टी च्या तत्वावर खारिज करण्याची विनंती केली आहे.

3. वादीने निशाणी क्र. 22 ला म्हणणे देवुन अर्जास विरोध केलेला आहे. त्याचे असे म्हणणे आहे की, त्याने केवळ प्रतिवादी क्र. 01 ते 05 यांचे विरुध्द कायम मनाई हुकुमाचा दावा दाखल केलेला आहे. त्याचे वाद मालमत्तेस केवळ प्रतिवादी क्र. 01 ते 05 यांचाच त्रास व अडथळा आहे. त्यामुळे इतरांना दाव्यात पार्टी करण्याची कोणतीही आवश्यकता नाही. वाद मालमत्ता आज रोजी त्याचेच ताबा व उपभोगात आहे. प्रतिवादी वाद जागेचे मालक व ताबेदार नाहीत व त्यांना वाद मालमत्ता सुभाष गायकवाड यांना विक्री करण्याचा कोणताही हक्क व अधिकार नाही. प्रतिवादी त्याच्या ताबा व उपभोगास त्रास व अडथळा करीत असल्याने हा दावा दाखल केला आहे. त्यामुळे अर्ज खारीज करण्याची विनंती केली आहे.

4. उभय पक्षकारांतर्फे विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

5. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, दावा कायम मनाईसाठी आहे. वादीने खरेदीखताआधारे दावा मिळकतीवर कब्जा सांगुन

प्रतिवादी त्यास हरकत व अडथळा करीत असल्याचे कथन केले आहे. जरी प्रतिवादीनी त्रयस्थ इसम सुभाष गायकवाड याला करारनाम्याने दावा मिळकतीचा कब्जा दिल्याचे कथन करुन त्याचे कडे कब्जा असल्याचे सांगितले असले तरी सुभाष गायकवाड हा वादीचे कब्जे वहिवाटीस हरकत व अडथळा करतो असे वादीचे कथन नाही. कायम मनाईची दाद कोणा विरुध्द मागावयाची ही वादीची निवड आहे. दावा मिळकतीवर त्याचा कब्जा आहे की नाही हे त्याला प्रथम सिध्द करावे लागणार आहे व त्या नंतरच त्याला कायम मनाईची दाद मिळणार आहे किंवा नाही हे ठरणार आहे. याउलट, प्रतिवादींनीच नि. क्र. 24 सोबत दाखल केलेल्या करारनाम्याच्या अवलोकनावरुन असे दिसुन येते की, सुभाष गायकवाड याला विक्री करायची ठरलेली मिळकत ही सर्व्हे क्र. 161/1/अ मधील अकृषीक (रा.मा.क्र. 04 एन.अे.पी. 36/87 दि. 25/01/88) नुसार 48 आर वगळुन उर्वरित 16 आर ही आहे. तर दावा मिळकत ही त्या सर्व्हे क्रमांकामधील खरेदीखताप्रमाणे रा.मा.क्र. 04 एन.अे.पी. 36/87 दि. 25/01/88 नुसार 48 आर ही आहे. यावरुन दावा मिळकत व सुभाष गायकवाड याला विक्री करावयाची मिळकत ही वेगवेगळी असल्याचे दिसुन येते. त्यामुळे केवळ प्रतिवादी म्हणतात म्हणुन सुभाष गायकवाड याला दाव्यात पक्षकार करता येणार नाही. दावा मिळकतीवर वादीचा कब्जा आहे किंवा नाही हे प्रथम ठरणार असल्याने व त्यानंतरच कायम मनाईच्या दादीचा विचार केला जाणार असल्याने सुभाष गायकवाड हा दाव्यास आवश्यक पक्षकार नाही. म्हणुन अर्ज फेटाळण्यास पात्र आहे.

6. वरील सर्व बाबींचा विचार करुन खालील प्रमाणे आदेश करण्यात येतो –

अर्ज फेटाळण्यात येतो.

Digitally signed by Avinash Madhukar Patil
Date: 2021.02.12 17:40:40 +0530

(अविनाश म. पाटील)
सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
उमरखेड

दिनांक : 12/02/2021